च्याप्रमाणे भूतांचाहि भोगाप्रत समुच्चय युक्त आहे असा अर्थ. जसा चेतन अशा स्त्रीपुरुषांच्या भोगांत समूह आहे ~~हे~~ त्याप्रमाणे अशी आशंका घेतली असतां काय तेथेही समूहाचा भोग आहे? किंवा तद्व्यतिरिक्ताचा? असें संदिग्धत्व ~~आहे~~ ~~साधुत्वें~~ हें ध्यानात घेतल्याने समाधान अनुचित आहे. कारण सर्वत्र चेतनाच्या भोक्तृत्वाने ~~[illegible]~~ संभव आहे? अशी आशंका असतां तात्पर्य सांगतात- 'तेथें शरीरव्यतिरिक्त' 'तेथें' = दृष्टान्तांत असा अर्थ. समत्व असतांही संघात दिसतो त्याप्रमाणे येथेही अशी शंका घेतो- 'पण ज्वाळेंत' ज्वाळेचा कार्यत्व असल्यामुळे तेथे तिळांच्या गुणभावाने अन्वय असू- तोही आत्म्यांचा तेथे (भोगांत) गुणभावाने अन्वय नाही. अशा आशयाने सांगतात- 'सार नाही असें सांगतात' संघातविशेषांनाच भोक्तृत्व आहे या पक्षाचा निराकरण करून स्वतः भोक्त्यांना भोगांत संघातसंस्कारांची अपेक्षा आहे या पक्षाचे निराकरण करितात- 'म्हणून भोक्त्यांचीच' गुणप्रधानभावाचा असंभव 'म्हणून' शब्दाचा अर्थ आहे.

॥ विवरण ॥

१९३।१

पण हा संघात नामक कोणता? व त्याप्रमाणे एकदेशात मात्र तर नव्हे. कारण तद्व्यापी भूतें सर्वत्र आहेत म्हणून सर्वत्र चैतन्य व भोगाचा प्रसंग येतो. अवयवीचा आरंभही नाही. कारण त्याचा भूतांहून भेद असतां तत्वसंख्येचा अतिरेक होतो. व अभेद असतां भूतमात्रतेने संघाताचा अभाव होतो. कारण भेदाभेदाचें अंगीकरण नाही. पण भूतचतुष्टयच स्वतंत्र आहे कारण अवयव्यादिकांना पारतंत्र्य आहे.

॥ विवरणव्याख्यान ॥

समस्ताच्या भोक्तृत्व पक्षांत दुसऱ्या दोषाचा समुच्चय दाखवितात- 'पण हा' काय एकदेशस्थत्व मात्र संघात आहे? किंवा एक अवयवी? किंवा एक द्रव्य ज्ञानाऽवलंबन योग्यता प्रतीति? किंवा एका अर्थक्रियेत युगपत् अन्वितत्व? किंवा संश्लेष मात्र? ~~किंवा [illegible]~~? असा कोणता? अशा अर्थ. पहिल्या पक्षाला दूषित करितात 'त्या प्रमाणे' याविषयीं हेतु सांगतात- 'कारण तद्व्यापी' या पक्षांत देहाहून बाहेरही भूतांना एकदेशस्थत्व संभवत असल्यामुळे तेथें चैतन्याप्रतीति भोक्तृत्व संभवते असा अर्थ. दुसऱ्या पक्षाला दूषित करितात- 'अवयवीचा' अर्थ क्र- आरब्ध अवयवी असा अर्थ कार्यरूप अवयवी हा अवयवांहून अन्यच आहे? किंवा अनन्यत्व आहे? किंवा अन्यानन्यत्व आहे? असा विकल्प करून पहिल्याला दूषित करितात- 'कारण त्याचा' "पृथिव्यप्तेजोवायवश्चत्वारि तत्त्वानि" = पृथिवी आप तेज वायु अशी चार तत्वें आहेत असें लोकायतिक (चार्वाक) यांनी अंगीकृत आहे. त्यामुळे त्याहून अतिरिक्त अवयवीचा अंगीकार केला असतां त्याच्या सिद्धान्ताची हानी होते असा अर्थ. दुसऱ्या पक्षी हा काय संघाताच्या भूतांत अंतर्भाव आहे? किंवा भूतांच्या संघातांत? असा विकल्प करून पहिल्याला दूषित करितात. 'अभेद असतां' दुसऱ्या पक्षी भूतांचें असिद्धि दोष असें जाणावें. तिसऱ्या पक्षाचा निरास करितात- 'भेदाभेदाचें' भूतांहून अवयवी भिन्न आहे, संख्यातिरेक तर नाही कारण त्याचा स्वातंत्र्य अंगीकृत नाही अशी शंका घेतो. 'भूतचतुष्टयच' गुणादिक आदि शब्दाचा अर्थ आहे. या पक्षांत भूता-

॥ विवरण ॥

म्हणून संख्यातिरेकाचा अभाव आहे. भगभूतांना योतुल्य नाही परंतु अवयवीचा काय आहे? तेथे भूतव्यापाराच्या अनपेक्षेने स्वतः ओत्या अवयवीचा परतंत्रतेच्या अभावामुळे संख्यातिरेक होईल. व जळादिकाचा पृथिव्यादि तंत्रत्व असल्यामुळे न्यूनही संख्या होईल. एकद्रव्य ज्ञाना उलंघन योग्यता पाति ही संघात नव्हे. कारण अर्थ स्वभावानें एकत्वापत्तीचा अयोग आहे. व अनेकांत एकत्वबुद्धीचा भ्रमत्व आहे. एका अर्थ क्रियेंत युगपत् अन्वय ही संघात नव्हे. कारण काष्ठाच्या आश्रयाने वायूकडून उत्पन्न झालेला

॥ विवरणव्याख्यान ॥

५८ ६।२२

मवाच्या अंगाचेत्ता असें सांगतात - 'भगभूतांना' पणभूत ~~स्वतंत्र~~ अवयवीचे ओकूलत्व भूतपोतुल्य होय. म्हणून मिथ्यात्व यौवने नाही? अशी आशंका असतां सांगतात - 'तेथे भूत व्यापाराच्या' अवयवीचा आत्मा व उत्सतां भूत तंत्रत्व येणार नाही? इतरथा आत्मत्वाची अनुपपत्ति आहे. म्हणून संख्यातिरेक तमाच आहे. असा अर्थ. पारतंत्र्य काय अन्य तंत्रतेने प्रतीयमानत्व? किंवा अन्यारब्धत्व? असा विकल्प करून पहिल्या पक्षाला दूषित करितात - 'जळादिकाचा' दुसऱ्या पक्षी पृथिवीचा जळारब्धत्व म्हणून न्यूनता पाते येत्ते असे जाणावे. परंतु मोठ्या ~~[illegible]~~ विकल्पातील तिसऱ्या पक्षाला दूषित करितात - 'एकद्रव्य' 'हे एक द्रव्य आहे' अशा ज्ञानाचे उलंघन योग्यत्व ~~ही~~ संघात नव्हे. असा अर्थ. ज्ञान शब्दाने काय प्रमाणज्ञान विवक्षित आहे किंवा दुसरे? पहिला पक्ष नाही असे सांगतात - 'कारण अर्थस्वभावाने' 'अर्थस्वभावाने' परमार्थतः असा अर्थ. भूतांना वस्तुतः एकत्वाचा अयोग असल्यामुळे हे एकद्रव्य आहे अशा ज्ञानाला प्रामाण्य घडत नाही. असा अर्थ. दुसऱ्या पक्षाला दूषित करितात - 'अनेकांत' म्हणून वास्तव संघात संघात नाही. असा अवशेष. ~~नव्या~~ त्याचा निरास करितात - 'एका अर्थ क्रियेंत' प्रमत्वादि क्रियेत असा अर्थ. क्रमाने एकार्थ क्रियासाधनांनी अन्वय होत असतो. 'युगपत् अन्वय ही' ~~[illegible]~~ अग्निवायु जळांना दहनहेतुत्वाने तेथे यौगपद्य व योग

॥ व्याख्यान ॥

मग एकाचा नियत भोग असो? नाही कारण तसेंही कोण्या एकाचा असें नि-
~~अवधारण होत नाही~~

॥ विवरण ॥

अग्नीने जळ दह्यमान असतांही संघातामुळे भोग प्रसंग येईल. अग्नि लोह पिंडा प्रमाणें संश्लेष (=तादात्म्य) हा संघात नव्हे. कारण शरीरांत वायूच्या तशा संश्लेषाचा अभाव आहे व अग्निव्याप्त लोहपिंडांत व वायु-संयुक्त प्यालेल्या जळांत भोग प्रसंग येईल. म्हणून भोगाच्या नियमितानें संघात नाही.

14/13

असें आहे तर एकाच मूलाचा भोग असो? असें सांगतो- 'मग एकाचा' गंधरसरूपस्पर्श भो-ग्यांत व भोगाच्या ठायी ~~असें~~ कठिण द्रव पाक-चलन गुणवान ~~असा~~ भूत संघात दिसत असतां कोण्या एकाचा भोग असावा असा अवधारित भोग होईल असें इत्यादि करितात 'नाही कारण' पण त्या कोणाचा भोग होईल

॥ विवरण व्याख्यान ॥

प्रसंग येतो असा अर्थ. पंचम्या पक्षाला निरसित करितात- 'अग्नि लोह पिंडा प्रमाणें' अशा रीतीने होते असें सांगतात- 'व अग्निव्याप्त' भोगाभाव असतांही संघात संभवत असल्यामुळे त्याचे निरसन नाही? अशी आशंका असतां सांगतात 'म्हणून भोगाच्या' इत्यादि अप्रयोजकत्व आहे असा अर्थ.

पण चार भूतांना भोक्त्यांच्या अविशेषाने एकाचा भोग हें अनुपपन्न आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'असें आहे तर' आपल्यास्तोस प्रसंगाचा अन्यत्व आहे? किंवा एकाचाच [illegible] अधिक [illegible] उठावा लागेल असें जाणेन. धन व विषयांच्या संनिधीच्या अनुबंधाने भोगव्यवस्था असावी अशी आशंका असतां सर्व विषय व भूतांच्या संनि-

५८५/२२

धीमुळे भोगव्यवस्था नाही असें सांगतात- 'गंधरस' पण भोगाची असे कसें म्हटले? कारण भूतांना भोक्तृत्व दिसत नाही? असें असेल तर नाही कारण भोगाच्या विशेषाने अधिष्ठान असावा असा आहे (व्याख्यानांस) विवक्षिताची उपपत्ति होईल येथे कोणताही विवक्षित नाही? असें [illegible] नाही? त्यावर सांगतो- 'पण त्या'

॥ व्याख्यान ॥

अवधारण सुत नाही. पण अवधारणाने काय त्याच्याबाजूनही विवक्षिततायांची (अतिरिक्त भोक्त्याच्या अभावाची) उपपत्ति होते. असे आहे तर कार्यात्मक समान भूतांत कोणाच्या गुणभावाची अनुपपत्ति असल्यामुळे हा पक्ष अयुक्त आहे. अंगीकरणा- ६४१३ त्मक भूतांतही समान चर्चा आहे. कारण भूतस्वभावाचा अविशेष आहे. अशी

॥ विवरण ॥

सिद्ध

तेवढ्यानेच शरीरव्यतिरिक्त भोक्त्याचा अभाव सिद्ध होतो असें सांगतो – 'पण अवधारणाने' परिहार करितात – 'असे आहे तर' चारींचा भोगांत अन्वय दिसत असल्यामुळे नियामकाच्या निर्धारणाचा अभाव आहे म्हणून चार भोक्त्यांच्या संघाताची अनुपपत्ति असल्यामुळे शरीरात्मक भूतांत भोक्तृत्व अयुक्त आहे – असा (परिहार). १२४१२ इंद्रियें च भूतात्मक आहेत आहे. असे कोणी म्हणतात त्यांचे मत आले तर त्याचे सांगितलेले दूषण त्यातल्या अतिदेश करितात – 'अंगीकरणात्मक' जर एकैक भूताने आरब्ध एकैक इंद्रियें आहेत तर प्रत्यभिज्ञानाच्या अभावादि दोष येतात. जर भूतचतुष्टयारब्ध एकैक इंद्रिय आहे तर संघातपक्षी

॥ विवरणव्याख्यान ॥

'कोणाच्या' अनियमित विशेष अशा एकाद्या भोक्त्याची ~~असतांही विवक्षिततायांची उपपत्ति होते अशी आशंका~~ असतां त्रिविध निरसन करून समांत गुणभावाच्या अनुपपत्तीचे प्रदर्शन करण्याकरितां म्हणून या परिहाराचा प्रसंग आहे अशी आशंका असता सांगतात – 'परिहार करितात' ५८८१३ सम्यक् परिहार करून सांगतात – 'चारींचा भोगांत' तेथे एकाचा प्राधान्य असून इतरांना तर गुणभाव आहे म्हणून चारींचे भोगन्वयांत दर्शन युक्त आहे अशी आशंका असतां सांगतात 'विशेषाच्या' म्हणजे एकाला प्राधान्य व इतरांना गुणत्व येणें नियामकाचा अभाव आहे असा अर्थ अतिदेश न्यायाचा ~~[illegible]~~ करितात – 'जर एकैक' प्रत्येकाला व समस्तांना भोगाचा असंभव 'आदि' शब्दाचा अर्थ आहे –

८३
१०५०

॥ व्याख्यान ॥

(समानचर्चा) ७४।४

उभयात्मक (कार्यकरणात्मक) समूह तर ही आहे म्हणून देहादि व्यतिरिक्त अहंप्र-
~~त्ययाच्या विषय आत्मा आहे असेंच मानतात~~ पुढे पृष्ठ ९९ वर

॥ विवरण ॥

(अतिदेश)

अनुपपत्त्यादिक दोष येतात - असा, कार्यकरणात्मक संघात भोक्ता आहे असे दुसरे लोकायतिक म्ह-
णतात त्यावर सांगतात - 'तशी उभयात्मक' कारण प्रत्यभिज्ञा व संधा त्यांची अनुपपत्ति येते - असा (परिहार) ~~असो~~,

पण इंद्रियें नामक कोणती आहेत? गोळकमात्र असें सुगत म्हणतात. त्यांच्या शक्ति असे मीमां-
सक म्हणतात. त्यांच्याहून अतिरिक्त दुसरी द्रव्यें असें अन्य सर्व म्हणतात. गोळकमात्र तर नव्हे. कारण
तद्रहित ही सर्पादिकांना शब्दादिकांची उपलब्धि दिसते "शरीरजैः कर्मदोषैर्याति स्थावरतां नरः"
[म.स्मृ. १२।८] "तस्मात्पश्यन्ति पादपाः" इत्यादि शास्त्रावरून गोळकरहित वृक्षादिकांना कर्मफलभोगस्थानता।

॥ विवरणव्याख्यान ॥

'संघाताचे अनुपपत्त्यादिक' येथील 'आदि' शब्दाला - आरंभक भूतसंसर्गाच्या असंभवाची व क्रमयोगादिकांच्या असंभवाची अ-
नुपपत्ति - अर्थ आहे;

(पूर्वपक्ष)

इंद्रियांच्या आत्मत्वाच्या निरासप्रसंगानें इंद्रियांच्या स्वरूपाचें निरूपण करण्याकरितां प्रश्नाचें उत्थापन करितात - "पण
इंद्रियें" इंद्रियांच्या प्रसिद्धतेने प्रश्नाच्या अनवसराची आशंका असतां विप्रतिपत्ती करून संदेह असल्यामुळे अवसर आहे असें
सांगतात - 'गोळकमात्र' 'मात्र' शब्दानें गोळकाधिष्ठान इंद्रियांची व्यावृत्ति केली जाते. 'त्यांच्याहून' = गोळकरूपांच्या शक्तीहून.
~~गोळकरूपांच्या शक्तीहून~~ अतिरिक्त इंद्रियें आहेत असें सांगण्याकरितां दोहोंच्या पक्षाला दूषित करितात - 'गोळकमात्र तर' वृ-
~~अस~~ 'सर्पादि' येथील
आदि 'आदि' शब्दाचा अर्थ आहे, म्हणूनच गोळकमात्र इंद्रियें नाहीत असें सांगतात - 'शरीरजैः', 'स्थावरतां नरः' या शास्त्रावरून
स्थावरतेला कर्मफलभोगस्थानता कळतें असल्यामुळे वृक्षादिकांना शब्दादिकांची उपलब्धी मानली असल्यामुळे गोळकमात्र इंद्रियें -
नाहीत असा निश्चय होतो. 'तस्मात्पश्यन्ति पादपाः'. इत्यादिकांवरून तर साक्षात् त्यांना शब्दादिकांचे उपलब्धृत्व कळते असा अभिप्राय.

॥ विवरण ॥

कळत असल्यामुळे शब्दादिकांची उपलब्धि मानली आहे व वृक्षादिकांच्या हिंसेचा प्रतिषेध असल्यामुळे ~~हे~~ त्यांना प्राणित्व कळते. म्हणून त्यांच्या शक्तीही इंद्रियें नाहीत. पण शक्तिमत् द्रव्यान्तराची कल्पना करण्यापेक्षा कळेल त्या स्थानांत शक्तीची कल्पना करणे लघु आहे असें असेल तर मग आत्म्याचाच क्षमकाली सर्व ज्ञानसामर्थ्याची कल्पना करावी. कारण सर्वगत ही आत्मा शरीरप्रदेशांत ज्ञानपरिणाम प्रमाणे गोलकप्रदेशांत ज्ञानपरिणाम होत असल्यामुळे गोलकांच्या ज्ञानान्वयव्यतिरेकांची उपपत्ति होते. आत्म्याला अनीन्द्रियत्व असतांही शरीरांत ज्याप्रमाणे त्याप्रमाणे हें जाणावें. मग इंद्रियें स्थानविशेषाच्या संबंधामुळे

१८४/२१

॥ विवरण व्याख्यान ॥

आहे. पण प्राणवानांना सुखादिभोग असल्यामुळे व वृक्षादिकांना तद्राहित्य असल्यामुळे भेद कसा? अशी आशंका असतां सांगतात- 'वृक्षादिकांच्या' इत्यन्यमताचा निरास करितात- 'म्हणून त्यांच्या शक्तीही.' शक्तिमत् गोलकांच्या वृक्षांत अभाव असल्यामुळे त्यांच्या शक्तींनाही इंद्रियत्व नाही असा अर्थ. गोलकांच्या शक्तींच्या इंद्रियत्वाचा प्रतिषेध करणाऱ्या ~~म्हणून~~ शक्तिमत् द्रव्यान्तर इंद्रियें आहेत असें उपन्यस्त आहे असें पूर्वशंकेचें उत्तर- 'पण शक्तिमत्' इत्यादि. शक्ति व शक्तिमत् असें द्वित्व कल्प्य आहे. आत्म्याला तर शक्तीच्या अशा लाघवामुळे शक्तींनाच इंद्रियत्व आहे. असा अर्थ. लाघवाच्या अनुरोधाने शक्तींना इंद्रियत्व कल्पना असतां मोठा प्रसंग येतो असें सांगतात- 'तर मग आत्म्याचाच' इत्यादि वृक्षादिकांत गोलकवत्त्वाच्या शक्ति असे द्वय कल्प्य आहे. येथें तर मात्र आत्म्यांत सामर्थ्य मात्र कल्प्य आहे असें लाघव आहे असा अर्थ. मग एकेकाली ज्ञानोदय होईल अशा शंकेला निरासीत करितात- 'कारण' पण तरी आत्म्याला सर्वगतत्व असल्यामुळे सर्वत्र ज्ञानोत्पत्ति होईल. तसें गोलकांच्या अन्वयव्यतिरेकांना विरोध होतो अशी आशंका असतां सांगतात- 'सर्वगत ही आत्मा' शक्तिमत् द्रव्यान्तर इंद्रियें आहेत या मताला उत्थापन करितात- 'मग इंद्रियें' पण त्यांना द्रव्यान्तरत्व असतां.

५८१।२

॥ विवरण ॥

चक्षुरादि शब्दवाच्य गोलकव्यतिरिक्त शक्तिमान् द्रव्यें असेत? नाही कारण त्याविषयीं प्रमाणाचा अभाव आहे. कर्तृव्यापार अशा रूपादिकांच्या उपलब्धीच करणाच्या अनुमानांत सिद्ध आहे? असे असेल तर नाही कारण मनव्यापार कर्तृ अशा करणांना करणान्तराचा अभाव असल्यामुळे हेतूला अनैकान्तिकत्व (व्यभिचारित्व) आहे. व करण विषय त्याच्या प्रेरणारूप कर्तृव्यापारास करणान्तराचा अभाव आहे. पण "सर्वे प्राणा अनूत्क्रामन्ति" [बृ.४।४।२] अशा आगमाने गम्य इंद्रियें आहेत असें असेल तर नाही कारण आ-

॥ विवरणव्याख्यान ॥

(संगति विषयी) 'ताम्राक्षनेत्र' इत्यादि ग्रन्थावरून अशी आशंका असतां सांगतात- 'रूपादिविशेष' काय त्याविषयी अनुमान प्रमाण आहे किंवा आगम? दोन्हीचा असंभव आहे असें सांगतात- 'नाहि कारण' 'रूपादिज्ञानोपलब्धि, करणपूर्वक आहे. तिला कर्तृव्यापारत्व असल्यामुळे संततीछेदनादि कर्तृव्यापारप्रमाणे.' अशा अनुमानाला प्रमाणत्व असल्यामुळे प्रमाणाभावामुळे हा हेतु असिद्ध आहे? अशी शंका घेतात- 'रूपादिज्ञान्या' मनव्यापाराच्या व्यावृत्तिकरिता कर्तृ विशेषण आहे. काय कर्तृव्यापार मात्र हेतु आहे किंवा प्रधान कर्तृव्यापारत्व? असा विकल्प करून पहिल्याला दूषित करितात- 'नाहि कारण स्वव्यापार?' दुसऱ्याचे निराकरण करितात- 'करणविषयक' करणांच्या प्रेरणांत स्वप्रधानकरण आहे? अशीहि शंका घेता येणार नाही. कारण प्रयत्नांत व्यभिचार होतो. पण त्यांत हि मनकरण आहे? नाहि कारण मनाच्या प्रेरणेतहि करणांतराच्या अभावाच्या योगाने सांगितलेल्या दोषाची निस्तार होतो. इंद्रियांच्या दृष्टान्तरूपाविषयी आगम प्रमाण आहे? अशी शंका घेतात- 'सर्वे प्राणाः' इंद्रियांना गोलकरूप किंवा त्यांचे शक्तित्व असतां शरीराशी सह गमन होईल. परंतु ते तर नाही. म्हणून अतिरिक्त इंद्रियांची सिद्धि होते असा अर्थ प्रकृतांना ही इंद्रियांचे ज्ञान होत असल्यामुळे त्यांना आगमगम्यत्व नाही असें सांगतात- 'कारण आगम संस्कार रहितांनाही?' आगम जाणीत अर्थज्ञान संस्कार रहितांना असा अर्थ. पण माझी प्रत्यक्ष इंद्रियांच्या अस्तित्वाविषयी प्रमाण आहे?

चतुर्थवर्णक

८६
१०५३

॥ विवरण ॥

आगम संस्कार रहितांनाहि इंद्रियांची प्रतिपत्ति होते. तथा प्रमाणें साक्षिवेद्य ही इंद्रियें नाहीत कारण कार्याच्या भावाभावावरून इंद्रियांच्या भावाभाव कळत नाही. म्हणून इंद्रियें नाहीत? सांगतो - आगमज्ञानाच्या पूर्वी संस्कारहितांना आदित्यादि व्यवहारा प्रमाणे स्थानविशेषांत चक्षुरादि इंद्रिय व्यवहार प्रवृत्त होतो. आगमज्ञान झाले असतां तर आदित्यादि देवता त्या प्रमाणें चक्षुरादि इंद्रियें स्थानविशेषांती अधिष्ठात्री आहेत असें कळते

१२५।१२

तो पुनः व्यतिरिक्त अग्नी हे अहंकाराची कार्यें आहेत असें सांख्य म्हणतात. तें अयुक्त आहे कारण प्रमाणाचा अभाव आहे. अध्यात्म अहंकार जन्य इंद्रियें आहेत असें अन्वयव्यतिरेक व आगमतर दिसत नाहीत. ~~आमचे सांख्याप्रमाणें भूतेंद्रियांची प्रकृति तामसी (आधिदैविक) अहंकार हें नाही. कारण प्रमा-~~

॥ विवरणव्याख्यान ॥

अशी आपांका असतां सांगतो 'तथाप्रमाणे' रूपादि उपलब्धीच्या सत्वासत्वावरून साक्षीप्रत्यक्षावरून इंद्रियादिकांच्या सत्वादिकाची सिद्धि होत नाही. कार्यांच्या भावाभावावरून इंद्रियांचा भावाभाव आपणास प्रतीत होत नाही त्याचप्रमाणें "तमुत्क्रामन्तं सर्वे प्राणा अनूत्क्रामन्ति" [बृ. ४।४।२] इत्यादि आगमावरून इंद्रियांची सिद्धि होते असा सिध्दान्त करितात - 'सांगतो' आगम पूर्वि संस्कार रहितांना ही इंद्रियांची प्रतिपत्ति होत असल्यामुळे त्यांना आगमगम्यत्व नाही असे जे सांगितले त्यावर सांगतात 'आगमज्ञानाच्या' आगमातिरिक्त इंद्रियांची सिद्धि करणे।

त्यावर सांगतात - 'आगमज्ञान'

इंद्रियांच्या स्वरूपाला साधून त्यांच्या प्रकृति (उपादान कारण) विशेषाचा निरूपण करण्याकरितां उपक्रम करितात - 'तो पुनः' या इंद्रियांचा आध्यात्मिक अहंकारापासून जन्म आहे? किंवा आधिदैविकापासून? दोन्हीही कारांत अनुपपत्ति आहे असें सांगतात - 'तें अयुक्त आहे' प्रमाणाभाव आहे असें म्हणणे असेल तर काय आध्यात्मिक अहंकारापासून जन्यत्वाविषयीं अन्वयव्यतिरेक प्रमाण आहेत? किंवा आगम वचन? दोन्ही नाहीत असें सांगतात - 'अध्यात्म अहंकार' आधिदैविक अहंकारापासून

चतुर्थवर्णक

८८
१०५४

विवरण

भाष्यांत: समस्तकार्याध्यक्ष भूतेन्द्रियांची प्रकृति केवळ (आधिदैविक) अहंकार हो नाही कारण प्रमाणाचा अभाव आहे. आप्तवचन प्रमाण आहे असें असेल तर नाही. कारण त्याला अतीन्द्रियत्व आहे. पण पुराणवाक्येंच त्याविषयीं प्रमाण आहेत हें खरें परंतु "अन्नमयं हि सोम्य मनः" (छां० ६।५।४) इत्यादि भूतविकारार्थांत मयट् श्रुतिविरोधामुळे अहंकाराची सत्तामात्र इंद्रियांना तेथे कथन केली जाते म्हणून विरोध नाही

१३५।१८
भौतिक इन्द्रियें आहेत असें वैशेषिकादिक म्हणतात. तेंही अयुक्त आहे. कारण त्याविषयीं प्रमाणाचा अभाव आहे. पण 'इंद्रियें भौतिक आहेत, त्यांना मध्यमपरिमाणत्वानें जन्यत्व असल्यामुळे घटादिकांप्रमाणें' असें असेल तर नाही कारण इंद्रियांची अणुपरिमाणत्वानें उपपत्ति होत असल्यामुळे हेतु असिद्ध आहे. मग.

॥ विवरणव्याख्यान ॥

५६०।१५
जन्यत्वाविषयीं हें प्रमाण नाहीं असें सांगतात- 'समस्तकार्याणामपि' प्रत्यक्षाचा असंभव आहे असें शंका घेतो- 'आप्तवचन' दुसऱ्या प्रमाणानें अर्थ जाणून त्याविषयीं शब्दरचना करणारा आप्त म्हटला जातो. येथें प्रमाणांतर नाहीं कारण कारणत्वें प्रत्यक्ष आहे किंवा दुसरें परिच्छेदक नाहीं असें सांगतात- 'कारण त्याला अतीन्द्रियत्व'. दुसऱ्या पक्षीं हें आप्त अनुमान प्रमाण आहे किंवा पुराणवचनी पहिला पक्ष नाहीं कारण व्याप्त हेतूचें निरूपण करता येत नाही. असा आक्षेप घेऊन दुसऱ्या पक्षाला उत्थापन करितात- 'पण पुराणवाक्यें' "त्रिविधोऽयमहंकारो महत्तत्त्वादजायत । इंद्रियाणां ततः सृष्टिर्गुणत्रयसमन्विते ॥" [ ] इत्यादि पुराणवचनें जाणावीत. पुराणवचनांचें सत्य अंगीकार करितात- 'खरें' मग त्यामुळे न्याय सिद्ध होतो? नाहीं कारण प्रत्यक्षश्रुतीचा विरोध आहे असें सांगतात- 'अन्नमयं' मग स्मृतींना त्याज्यत्व आहे? नाहीं असें सांगतात- 'अहंकाराधीनता'

५८।१२
सांख्यमताचा निरास करून कणभुगादि मताला उत्थापन करितात- 'भौतिक'. त्याला दूषित करितात- 'तेंही' प्रमाणाभाव या हेतूच्या असिद्धिची शंका घेतो- 'पण इंद्रियें' हेतूचें समर्थन करितो- 'त्यांना मध्यम'. मध्यमपरिमाणत्व असिद्ध आहे असें सांगतात- 'नाहीं कारण इंद्रियांची' द्रव्यत्व असल्यामुळे इंद्रियांना परिमाणत्व तर सिद्ध आहे. त्यांत तेथ.

॥ विवरण ॥

विग्रहावस्थास अणुपरिमाणत्व सिद्ध होईल की नाही कारण अणु परिमाण मनाने विस्तृत आत्मादि दर्शन होते. पण इंद्रियें भौतिक आहेत, त्यांना रूप रस गंध स्पर्शांचे नियमाने अभिव्यंजकत्व असल्यामुळे प्रदीप, आस्वादक हिंग्वादि द्रव्य, व्यंजक वायू प्रमाणे' अशा अनुमानान्तराने प्रत्येक भूतारब्ध प्रत्येक इंद्रिय आहे. असें अनुमान होते? नाही कारण शब्दगुणवद्ध आकाशाने अनारब्ध शब्दाभिव्यंजक श्रोत्रांत हेतुचा अनैकान्तिकत्व आहे. कारण कर्णशष्कुल्यवच्छिन्न आकाशमात्राला श्रोत्रत्व मानले असल्यामुळे त्याला अनारब्धत्व आहे.

॥ विवरणव्याख्यान ॥

आणि दुसऱ्या परिमाणाच्या अनुपलब्धीने त्याचें (=मध्यम परिमाणाचें) सिद्ध आहे कीं का दुसऱ्या रीतीने? दुसरा पक्ष नाही कारण तिची उपलब्धी होत नाही. पहिला पक्ष हि नाही असें सांगतात- 'कारण इंद्रियांची' महत्परिमाणत्व तर अनुपपन्न आहे कारण सर्वत्र विषयदर्शनाचा अभाव आहे. शरीर परिमाणत्वही नाही. कारण मनुष्य शरीरव्यापि इंद्रियांच्या सूक्ष्म कोटरशरीरांत व्याप्तीचा अभाव आहे. म्हणून इंद्रियांना अणुत्व आहे असा अर्थ. ~~भौतिकत्वाविषयी~~ इंद्रियांना अणुत्व असतां विषयाच्या आकलनें अवगाहाची अनुपपत्ति असल्यामुळे अणुत्व आश्चर्यकारी नाही असें सांगतात 'मग' सरकल्याने विषयावगाहाचें उ-मच्य रीतीनें संभवतो असें सांगतात- 'नाही कारण अणु' भौतिकत्वा विषयी दुसऱ्या रीतीने अनुमान प्रमाणाची आशंका घेतात- 'पण इंद्रियें' चक्षु तैजस आहे कारण त्याला रूपादिकांमध्ये रूपाचेंच अभिव्यंजकत्व आहे प्रदीपा प्रमाणें' ? जिव्हा आप्य आहे तिला रसादिकांमध्ये रसालाच अभिव्यंजकत्व असल्यामुळे लाळ प्रमाणे' या प्रमाणे सर्वत्र प्रयोग जाणावा. प्रथम प्रयोगांत अतीन्द्रियाच्या व्यावृत्ती करिता 'रूपादि' हे विशेषण आहे. मनाच्या व्यावृत्ती करिता 'च' हा शब्द आहे. असिद्धीच्या परिहाराकरिता 'रूपादिकांमध्ये' हें विशेषण आहे. विपक्षांत बाधक तर्काचा अभाव असल्यामुळे अप्रयोजक हेतु आहे असें सांगतात- 'नाही कारण मृदु' स्पर्शव्यंजकत्वाची अनुपपत्ति बाध आहे अशी आशंका असतां सांगतात- 'शब्दाभिव्यंजक' श्रोत्राला आरब्ध सजातीय विशेषगुणवद्द्रव्यारब्धत्वाचा अभाव असतांही शब्दाभिव्यंजकत्व आहे. त्या प्रमाणे येथेही जाणावे. असा अर्थ. पण श्रोत्राला आकाशाने अनारब्धत्व कसें? त्यावर सांगतात- 'कर्णशष्कुली' सजातीय अनेक द्रव्यांना आरंभ-

॥ किरण ॥

मनसाही त्यांचे अभिव्यंजकत्व असल्यामुळे भूत चतुष्टयारब्धत्व प्रसंग येतो. पण आत्माकाशादिकांच्याही अभिव्यंजकत्वाने मनाला साधारणत्व असल्यामुळे भूतारब्धत्व नाही? असें असेल तर संख्या, परिमाण, संयोग विभाग, जाति, विशेष, समवायादिकांच्याही अभिव्यंजकत्वाने इंद्रियांना साधारणत्व असल्यामुळे भूतांनी आरब्धत्व सिद्ध होणार नाही. असाधारण विषयारब्ध बुद्धिंद्रियें आहेत? असें असेल तर आत्मारब्ध मन होईल. कारण त्याचा (आत्म्याचा) असाधारण (मन) विषयत्व आहे. पण एकद्रव्याने आरब्ध द्रव्य नाही? असें असेल तर

॥ किरणव्याख्यान ॥

काल असल्यामुळे न आकाशाला एकद्रव्यत्व असल्यामुळे आरंभकत्व नाही असा अर्थ. नियमाने अभिव्यंजकत्व = व्यंजकत्याच्या अंतर्गतत्वाचे अनधिकरणत्व इत्यादिकांत अतिप्रसंग सांगतात - 'मनसाही' मनाला सर्व अर्थांचे ग्राहकत्व असल्यामुळे ग्राह्यांच्या सजातीय गुणवालाकडून आरब्धत्व प्रसंग येतो असा अर्थ. मन भूतचतुष्टयारब्ध नाही त्याचा (अभिव्यक्ती) साधारण कारणत्व असल्यामुळे अदृष्ट प्रमाणे? अशी शंका घेतो - 'पण आत्माकाशादिकांचा' हा हेतु अतिप्रसंगाने ग्रस्त आहे असें सांगतात - 'असें असेल तर संख्या' जो ज्याचा असाधारण विषय असतो तो त्याच्याकडून (विषयवाल्याच्या सजातीय गुणवद्रव्याकडून) आरब्ध असतो. मनाचे भूतचतुष्टयाचा साधारण विषयत्व असल्यामुळे त्याचा (मनाचा) त्याच्याकडून (= भूतचतुष्टयाकडून) आरब्धत्व नाही अशी शंका घेतो - 'असाधारणविषयारब्ध' आत्म्याचा नाहीं इंद्रियांकडून अग्राह्यतेने मनाच्या असाधारण विषयत्वामुळे मनाला तदारब्धत्व येईल असें सांगताव 'तर आत्मारब्ध मन' आत्मा द्रव्यारंभक नाही त्याचा एकद्रव्यत्व असल्यामुळे 'गगनाप्रमाणे' अशी शंका घेतो - 'पण एकद्रव्याने' सजातीय तंतूंना पटारंभकत्व दिसते आत्म्याला तर एकद्रव्यत्व असल्यामुळे आरंभकत्व नाही असा अर्थ. पटप्रमाणे सावयवतेने अनेक द्रव्यारब्धत्व असतें तरीहि मनाचा निरवयवत्व असल्यामुळे आत्मारब्धत्व होईल. गगनाप्रमाणे संदिग्ध साध्यतेने दृष्टान्तत्व हो नाही अशा आशयाने सांगतात - 'असें असेल तर नाही कारण निरवयव' पण मनाला अकार्यत्व-

चतुर्थकोष्ठ

९०/१०५८

॥ विवरण ॥

नहि कारण सावयव अनेक द्रव्यारम्भ असते. असें एरवींच आहे. निरवयव तर मन निरवयव आत्मारम्भ कोठें असणार नाहीं म्हणून अणुभावकरून च अभौतिकत्वाची सिद्ध आहे

१९६।८ तीं इंद्रियें सर्वगत आहेत असें योगशास्त्रानुयायी म्हणतात. ते देखील प्रमाणहीन आहे. आत्मा इंद्रियें व मन सर्वगत आहेत त्यांना सर्वत्र दृष्टकार्यत्व असल्यामुळें आकाशाप्रमाणें' असें असें उत्तर नाहीं कारण हेतुही असिद्ध आहे. जेथें शरीर तेथें सर्वत्र दृष्टकार्यत्व आहे असें असें उत्तर हेतु शरीरांत अनैकान्त आहे पण त्यांना

॥ विवरणव्याख्यान ॥

असल्यामुळें आरब्धत्व कसें? ह्याची आशंका येत नाहीं. 'मन अकार्य आहे त्याला निरवयव द्रव्यत्व असल्यामुळें आत्म्याप्रमाणें' असें असें उत्तर नाहीं कारण गुणवत्त्वादि लक्षण द्रव्यत्वा आत्म्यांत असल्यामुळें दृष्टान्ताला साधनविकलत्व आहेच (निरवयव) या विशेषणाची असिद्धि आहे असें जाणावें. इंद्रियांच्या भौतिकत्वाचें निरसन सिद्धान्ताच्याविरुद्ध आहे अशी शंका असता त्याविषयीं प्रमाणविशेषाचें (अनुमानाचें) आम्ही निराकरण करितो. भौतिकत्वाचें नाहीं असें सांगतात- 'म्हणून आगम' येथें द्वितीय कल्प (= इंद्रियांचें ~~सर्वगत~~ अणुपरिमाणत्व) अंगीकृत आहे असें जाणावें.

अशा रीतीनें कारणाच्या विप्रतिपत्तीचें निराकरण करून परिमाणाच्या विप्रतिपत्तीचें निराकरण करण्याकरितां पूर्वपक्ष सांगतात- 'तीं इंद्रियें' प्रमाणाच्या अभावानें दूषित करितात- 'ते देखील' (प्रमाणाभाव) हेतु असिद्ध आहे असें सांगतात- 'आत्मा इंद्रियें' जरी येथें इंद्रियांचें सर्वगतत्व साध्य केलें तरी आत्मादिकांत व्यभिचार येईल ह्या निरासाकरितां त्यांनाही पक्षत्व सांगितलें असा अर्थ. घटादिकांच्या व्यावृत्तीकरितां 'सर्वत्र' हें विशेषण आहे. काय सर्वत्र दृष्टकार्यत्व हेतु आहे किंवा जेथें शरीर तेथें दृष्टकार्यत्व आहे असा विकल्प करून पहिल्या पक्षांत दूषण करितात- 'आणि कारण हेतूचें' (कारण तसें दिसत नाहीं असा अर्थ) दुसऱ्या पक्षाचा अनुवाद करितात- 'जेथें शरीर' ज्या प्रदेशांत शरीर असतें त्या प्रदेशांत त्या शरीराला स्वतःला उचित अधिकारित्व असून सर्वगतत्व नसल्यामुळें तेथें व्यभिचार सांगतात- 'हेतु शरीरांत' दुसऱ्या हेतूचा आक्षेप घेतो- 'पण त्यांना'

॥ विवरण ॥

आकाशाप्रमाणे परोपाधिगमनत्व असल्यामुळे सर्वगतत्व आहे? असें असेल तर नाही. कारण शरीरावयवांना देखील परोपाधिगमनत्व आहे. पुनः सर्वगतत्व असतां एककाळी सर्व विषयांची उपलब्धि होईल. पण शरीरांतच वृत्तिलाभ होत असल्यामुळे तसें नाही असें असेल तर मग बाहेर इंद्रियसद्भावकल्पनाप्रमाणाभाव [illegible] नाहीं.

इंद्रियें अप्राप्यकारी आहेत असें सुगत म्हणतात तें अयुक्त आहे. कारण दूर असलेल्या स्पर्शरसगंध (~~परन्तु यांची शरीरदेशींच उपलब्धि होते~~) - विषयांशी संबंधितांचीच उपलब्धि होते. यांच्या उपलब्धीचा प्रसंग येईल. पण योग्यदेशी अवस्थानाची अपेक्षा आहे असें असेल तर नाही. कारण

॥ विवरणव्याख्यान ॥

अभिप्रायाने दूषित करितात - 'नाही कारण शरीरावयवांना'. अवयवांचे गमन अवयवीच्या गमनाशिवाय न असतें न अवयवांपलीकडे सर्वगतत्व नाही. म्हणून तेथें व्यभिचार होतो असा अर्थ. पुनः इंद्रियव्यापित्ववाद्यांकडूनही आक्षेपणीय आहे कीं - काय इंद्रियांना कार्यजननयोग्यत्व शरीराबाहेर अन्यत्रही आहे किंवा शरीरातच आहे? पहिल्या पक्षीं अतिप्रसंगबाध सांगतात - 'पुनः सर्वगतत्व' इत्यादिकाने. उत्थापन करितात - 'पण शरीरांतच' 'वृत्तिलाभ' कार्यजननयोग्यत्व. रूपादिकांच्या उपलब्धीवरून इंद्रियें कल्पिली जातात. तशी शरीरावच्छेदानें इंद्रियें असतां होते. म्हणून अन्यत्र (= बाहेर) सत्त्वकल्पकाचा अभाव असल्यामुळे ते (बाहेर इंद्रियसत्त्व) नाही असें सांगतात - 'मग बाहेर' रूपादिदर्शनारूप प्रयोजनशून्यत्वामुळे प्रमाणशून्यत्व आहे असा अर्थ.

इंद्रियांचे परिच्छिन्नत्व अंगीकार करून कोणी त्यांना अप्राप्यकारी म्हणतात त्यांचा अनुवाद करितात - 'इंद्रियें' विषयदेशाला (= संबंधाला) प्राप्त न करिता होता शरीरदेशीं स्थित इंद्रियांना कार्यकरत्व आहे असा अक्षरार्थ. अप्राप्यकारित्व असतां अतिप्रसंग येतो असें सांगतात - 'तें अयुक्त आहे'. सहकारींच्या अभावामुळे अतिप्रसंग येत नाही? अशी शंका घेतो - 'पण योग्यदेशी' (विषयाचे) इंद्रियाशी संसर्गाला योग्य देशीं अवस्थान सहकारी आहे? किंवा दुसरें? असा विकल्प करून पहिल्या पक्षी आत्म्या इत्यादींची सिद्धि होते. असा अभिप्राय ठेवून दुसऱ्या पक्षाला दूषित करितात - 'नाही कारण इंद्रियदेशाच्या'

॥ विवरण ॥

इंद्रियदेशाच्या प्राप्तीवाचून त्याच्या देशाचे निरूपण करिता येत नाही. स्पर्श रस घ्राणेन्द्रियाप्रमाणे चक्षुः श्रो-
(विषयाशी संबंध असता कार्य)
त्रांसही प्राप्य (संबंध) कारित्वाचे अनुमान केले जाते. वर्तजाळा आलीकडे शीघ्रगमन दिसत असल्या-
मुळे चक्षूला ध्रुवादिप्राप्ति निरुद्ध नाही. शब्दाचीही ~~त~~ दूरदेशी उपलब्धी होत असल्यामुळे त्याच्या लहरी-
असतानाप्रमाणे परंपरेने श्रोत्राशी समवाय नाही. म्हणून भौतिक, परिच्छिन्न प्राप्यकारी इंद्रिये आहेत
असें सिद्ध होते.

मग मनननामक ~~श~~ काय आहे? नित्य निरवयव अणु परिमाण असे वैशेषिकादिक म्हणतात.

॥ विवरणव्याख्यान ॥

पण स्पर्शादिकांना प्राप्यकारित्व असतांही, चक्षुश्रोत्रांना प्राप्यकारित्व नाही कारण तसें दिसत नाही अशी
आशंका असता सांगतात- 'स्पर्शरस' 'चक्षुश्रोत्र प्राप्यकारी आहेत त्यांना बाह्येंद्रियत्व असल्यामुळे
स्पर्शादिकांप्रमाणे' असा अर्थ. पण योजन शतादि दूर असलेल्या ही ध्रुवादिकांची नेत्र उन्मीलन मात्रावरून
उपलब्धि होत असल्यामुळे नेत्राला प्राप्यकारित्व नाही अशी आशंका असतां सांगतात- 'वर्तजाका' सूर्योद-
यादिकाच्या अभ्युपगम मात्राने, त्याच्या किरणांना स्वतः पृथ्वीतळव्याप्तीप्रमाणे, नेत्रालाही तेजस्त्वानें
लवकर दूरवर्ति पदार्थाचे दर्शन युक्त आहे असा अर्थ. दंडभेरी संयोगामुळे गगनसमवायी कोणी शब्द उत्पन्न होतो तो
ही असमवायी कारण तेने शब्दान्तराचा आरंभ करितो. तसा तोही. अशा रीतीने परंपरेने श्रोत्रपर्यंत उत्पत्तीने
शब्दाचे श्रोत्रानें ग्रहण होते. अशा तार्किक प्रक्रियेच्या निरास करितात- 'शब्दस्योऽपि'. तेथें 'शब्द' असा प्रत्यय
उत्पन्न येथें शब्द असा प्रत्ययाच्या अभावामुळे हा पक्ष योग्य नाही. दूरदेशी अभिव्यक्त शब्दाची अभिव्यंजक वायूकडून
सिपिसताच्या निरास भावात्मका श्रोत्रांतही अभिव्यक्ति होते असा अर्थ. बाह्येंद्रियनिरूपणाचा उपसंहार करितात- 'म्हणून'
मनविषयीही विप्रतिपत्ति दिसत असल्यामुळे ते सांगतात- 'मगमननामक' 'मन नित्य आहे त्याचा [illegible]

॥ विवरण ॥

परिच्छिन्नत्वामुळे नित्यत्व नाही. पण निरवयव द्रव्यत्वामुळे आत्म्याप्रमाणें ते नित्य आहे? असें असेल तर नाही. बाह्यकरणत्वानें इंद्रियाप्रमाणें सावयवत्वाचे अनुमान होतें व अन्नमयत्व श्रुतीहि आहे. पण मूर्त द्रव्याकडून अभिघात होत नसल्यामुळे ते निरवयव आहे? असें असेल तर नाही कारण मनाला बहिर्गमनाचा

॥ विवरणव्याख्यान ॥

असून कारणशून्यत्व असल्यामुळे आत्म्याप्रमाणें ' मन निरवयव आहे त्याला मूर्तानें अप्रतिबध्यमानत्व असल्यामुळे गगनाप्रमाणें ' मनाला मध्यमपरिमाणत्व असतां स्थूल (महत्) व सूक्ष्म (लघु) शरीरांत समानत्वानें राहणे होणार नाही. सर्वगतत्व असतां एकेकाळी ज्ञानोत्पत्ति होईल म्हणून ते अणु असा आहे. नित्य इत्यादिकांचा अर्थ. तेथे नित्यत्व तर अणुत्व आहे असें सांगतात - 'परिच्छिन्नत्वामुळे' ' मन अनित्य आहे. त्याला परिच्छिन्नत्व असल्यामुळे घटाप्रमाणें ' अशा परमाणूंत व्यभिचारही ~~अनुमानावरून~~ नाही. कारण त्यांची मान्यता नाही. ' मन विभु आहे त्याला सर्वदा स्पर्शरहित द्रव्यत्व असल्यामुळे काळाप्रमाणें ' अशा अनुमानावरून अपरिच्छिन्नत्वाची सिद्धि होते? अशी शंका घेतां येणार नाही कारण त्यांत व्यभिचार होतो असा अर्थ. अनित्यत्वाच्या अनुमानाला प्रति अनुमानाच्या विरोधाची शंका घेतात - 'पण निरवयव द्रव्यत्वामुळे' घटादिकांच्या व्यावृत्तीकरिता 'निरवयव' हें विशेषण आहे. गुणादिकांच्या व्यावृत्तीकरितां 'द्रव्यत्वामुळे' हें विशेषण आहे. हेतूचे विशेषण असिद्ध आहे असें सांगतात - 'बाह्यकारण करणत्वानें' ' मन सावयव आहे त्याला द्रव्यत्व असून करणत्व असल्यामुळे नयनाप्रमाणें ' असा अर्थ. विशेषण नसेल तर होणार नाही कारण तेन मन व अर्थांच्या सन्निकर्षाच्या व्यावृत्तीकरिता आहे. ' मनत्व सावयववृत्ति आहे मूर्तवृत्तित्वामुळे घटत्वाप्रमाणे ' असा अर्थ. नित्यत्व व अनित्यत्वाला ग्रहण करणाऱ्या अनुमानाला सप्रतिपक्षत्व असल्यामुळे अनित्यत्वाचा निश्चय नाही? अशी आशंका असतां सांगतात - 'व अन्नमय' सावयवत्व साधक अनुमानाला प्रति अनुमानाच्या विरोधाची शंका घेतात - 'पण मूर्त द्रव्याने' मूर्तद्रव्याने अप्रतिबध्यमानत्वामुळे असा अर्थ. अनभिघात अन्यथासिद्ध आहे असें सांगतात - 'कारण मनाला'

॥ किरण ॥

अभाव आहे. उत्क्रान्ति इंद्रियांनाही समान आहे. संयोग विभागवत्त्वामुळे घटादिकांप्रमाणे अणुपरिमाणता नाही. सर्वगतत्व असतां तर एकेकाळी सर्व इंद्रिय संयोगामुळे सर्वांच्या ज्ञानाचा प्रसंग येतो. मध्यमपरिमाणत्वाने सावयवत्व असतां अवयवांच्या उपचय व अपचय संभवत असल्यामुळे स्थूल व सूक्ष्म देहाच्या प्रतिपत्तीचा विरोध नाही.
१५४।७ समनन्तर (पूर्वीचे ज्ञानाचा) प्रत्यय व उत्तर ज्ञानाच्या कारण तेंच मन आहे असें शाक्य (बौद्ध) मानतात. तसें नाही कारण ज्ञानाचा ज्ञानान्तराच्या हेतुत्वाविषयीं व्याप्तीचे सापेक्षत्व आहे. शाब्दज्ञानही व्याप्तिजन्य आहे असें.

॥ किरण व्याख्यान ॥

पण 'सर्वे प्राणा अनूत्क्रामन्ति' [बृ. ४।४।२] इत्यादिकांनी इंद्रियांच्या (व मनाच्या) उत्क्रान्तीचे श्रवण असल्यामुळे लिंग मनाच असिद्ध आहे? अशी आशंका असतां सांगतात - 'उत्क्रान्तीतर' इंद्रियांची उत्क्रान्ति असतांही जसा त्यांचा अनुपघात आहे त्याप्रमाणे मनाचाही असा अर्थ. सांगितलेल्या अणुत्वाचे निरसन करितात - 'संयोग' 'मन अणु नाही' त्याला संयोगित्व व विभागित्व असल्यामुळे घटाप्रमाणे असा अर्थ. परमाणूंत व्यभिचार नाही कारण त्र्यणुकाहून अतिरिक्त परमाणूंच्या अभाव आहे. सर्वगतत्वाचे निरसन करितात - 'सर्वगतत्व असतां' पण मध्यमपरिमाणत्व अनुपपन्न आहे कारण सूक्ष्म कीटादि ५९१।१९ शरीरांत मनाच्या वृत्तीची अनुपपत्ति येते असें सांगितले? त्यावर सांगतात - 'मध्यमपरिमाणत्वाने' ज्ञानातिरिक्त मनाचा अभाव असल्यामुळे त्याच्या परिमाणासंबंधीं विचाराला अवसर नाही? अशी बौद्ध शंका घेतो. 'समनंतर प्रत्यय' अतीताचा (=शवटील) अनन्तर प्रत्यय असा अर्थ. विकल्पाला सहन करीत नसल्यामुळे हें युक्त नाही असें सांगतात - 'तसें नाही' काय ज्ञानत्वाची अपेक्षा करून पूर्व प्रत्ययाचे उत्तरप्रत्ययाचे जनकत्व आहे? कि त्याची अपेक्षा न करितां? पहिला पक्ष नाही कारण त्यांच्यांत व्याप्तीचा अभाव आहे असें अभिसंधान करून दुसऱ्याला दूषित करितात - 'कारणताया' धूमाग्नींच्या व्याप्ति असल्यामुळे धूमज्ञान अग्निज्ञानाला जनक आहे हें दृष्ट आहे असा अर्थ. पण इंद्रियांच्या व्याप्तीवांचूनही शाब्दज्ञानाला अर्थज्ञानजनकत्व दृष्ट आहे? अशी आशंका असतां दुसरें म्हणतात शब्दाच्याही अनुमानांत अंतर्भाव असल्यामुळे व्यभिचार नाही असें सांगतात - 'शाब्दज्ञानही'

५८
१०६२

॥ विवरण ॥

दुसरें मत आहे. विशिष्टज्ञान हें संप्रयोगजन्य आहे विशेषणज्ञानजन्य नाही. समनंतर प्रत्ययापासून उत्तर प्रत्ययाला ज्ञानाकार लाभ होतो? असें असेल तर नाही कारण वस्तुस्वभावाला अन्याधीनत्व नाही. म्हणून सावयव अन्यत मत आहे.

१५०/१२

हा आत्मा तरी काय आहे? सर्वगत जड आहे असें कोणी म्हणतात. सर्वत्र दृष्टकार्यत्व सर सर्वगतत्वाचि-

---

॥ विवरणव्याख्यान ॥

पण प्रतीत्य अभाव असतांही विशेषणज्ञानाला विशिष्टज्ञानजनकत्व दिसते? अशी आशंका असतां जेथें एकेन्द्रियग्राह्यांत्र विशेषण विशेष्यभाव असतो तेथें इंद्रियसन्निकर्षज विशिष्टज्ञान असते असें सांगतात- 'विशिष्टज्ञा-नहीं' पण 'सुगंधी चंदन' इत्यादिकांत विशेषण विशेष्यांना एकेन्द्रियग्राह्यत्व नसल्यामुळे विशिष्टज्ञान संप्रयोगजन्य नाही? असें असेल तर नाही कारण तेथें विशिष्टज्ञानाला साक्षिवेद्यत्व मानले आहे. किंवा विशेषणज्ञान संस्कारसहित इंद्रियसंप्रयोगापासून विशिष्टज्ञानाची उत्पत्ति होते असा अर्थ. पण समनंतर प्रत्ययाला उत्तरज्ञानजनकत्व मानलेन असल्यामुळे त्याहीची अपेक्षा नाही? अशी शंका घेतो- 'समनंतरप्रत्ययापासून' अधिपति, सहकारी, समनंतर प्रत्यय व त्या अनुरोधावरून आलंबन प्रत्ययापासून ज्ञानाचा जन्म ग्रहण केला जातो. त्यांत चक्षुलक्षण अधिपति प्रत्ययापासून ज्ञानस्वरूप उत्पन्न होते आलोक लक्षण सहकारि प्रत्ययापासून त्याची स्पष्टता होते. आलंबन प्रत्ययापासून घटादि आकाररूपता उत्पन्न होते. व पूर्व प्रत्ययापासून बोधाकारता उत्पन्न होते असा अर्थ. ज्ञानच जो आकार तो ज्ञानाकार असा विग्रह. आकाराला आकारीशी अभिन्नत्व असल्यामुळे आकाराला आकारीजनकाच्या अतिरिक्त जन्यत्व नाही, असें सांगतात- 'न ह्याकारण वस्तु'

आतां न्यायवैशेषिक मत निराकरणाचा उपसंहार करितात- 'इत्थं न स्वरूप'

६५६/१८

अशा रीतीने हेय (=त्याज्य) स्वरूपाचा निराकरण करून उपादेय (=ग्राह्य) स्वरूपाचे निरूपण करण्याकरिता संशय घेतात- 'हा आत्मा तरी' काय सर्वगत जड आत्मा आहे? किंवा त्याच्या विपरीत आहे? असा संशयाचा अर्थ. पूर्वपक्षवाल्यांमतांत 'सर्वगत' कथनांत अनुमान प्रमाण आहे? किंवा अर्थापत्ति किंवा आगम? पहिला पक्ष नाही असें सांगतात- 'सर्वत्र दृष्ट कार्यत्वतर'

॥ विवरण ॥

धर्मो हेतु नाहीं. असें वर सांगितलें. पण व्यवहित देशीं अदृष्ट (=पुण्यपाप) निमित्तानें नृत्यादि-
अदृष्टवान् आत्मसंयोगाची
क्रियेचा आरंभ होत असल्यामुळे त्याला आत्मसमवेततान अदृष्टाची अपेक्षा असल्यामुळे आत्मा
सर्वगत आहे. असें असें म्हणता येत नाहीं कारण येथें (=मनुष्य शरीरांत) समवेत अदृष्टाच्या फलत्वानें
(=मनुष्य शरीराच्या)
स्वर्गादि भोगाच्या उत्पत्तीत असल्यामुळे अदृष्टवान् प्रदेशाचा संयोग होत नाहीं. केवळ आत्म प्रदेश संयो-
गाला फल हेतुत्व नाहीं. म्हणून आगमावरूनच सर्वगतत्वाची सिद्धि होते. अन्यथा जाड्य हे नाहीं.

॥ विवरण-व्याख्यान ॥

पृ. ९०/४ (अर्थपूर्ति)

"वर सांगितलें" हेतु जो असिद्ध आहे. येथें असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचें उत्थापन करितो - 'पण व्यवहित' इत्यादि. पर-
समवेत नृत्यादि क्रियेनें अन्यत्र सुखादि उत्पन्न होते. नृत्याक्रियेचा त्याच्या अदृष्टानें संपादकत्व नसतां तर त्याच्या
सुखाला हेतुत्व नाहीं. त्याच्या अदृष्टानें जन्यत्व हि त्याच्या संबंधावाचून अनुपपन्न आहे. अशा रीतीनें अदृष्टवान्-
क्रियेच्या
आत्मसंयोगावाचून अन्यत्र उत्पत्तीची अनुपपत्ति असल्यानें त्याला सर्वगतत्व आहे. काय ज्या प्रदेशांत अदृष्ट
(येथें)
उत्पन्न होते त्या प्रदेशानें युक्त आत्मसंयोगाला हेतुत्व आहे किंवा आत्ममात्रसंयोगाला? पहिला पक्ष नाहीं असें
सांगतात - 'नहि कारण' येथें =मनुष्य देहावच्छिन्न आत्मप्रदेशांत अदृष्टवान् मनुष्य शरीरावच्छिन्न आत्म
प्रदेशाच्या संसर्गाचा अभाव असतांहि पर पृष्ठावर (=~~स्वर्गीत~~ स्वर्गात) सुख उत्पन्न होत असल्यामुळे त्याच्या अनुपपत्तीनें
आत्म्याला सर्वगतत्व नाहीं असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचा निरास करितात - "केवळ आत्मसंयोगाला" कारण सर्वदा
सर्वांना सुखादि उपभोग प्रसक्ति होत असल्यामुळे असें नाहीं असा अर्थ. पण परिच्छिन्नत्व असतां अनित्यत्वाची प्रसक्ति होत अस
ल्यामुळे सर्वगतत्व मुलाशहि ग्रहणीय आहे? अशी आशंका असतां आत्म्याच्या सर्वगतत्वाचा निरास करीत नाहीं परंतु
त्याच्या प्रमाण विशेषाच्या अशा आशयानें सांगतात - 'म्हणून आगमावरूनच' "आकाशवत् सर्वगतश्च नित्यः"
[ ] "नित्यं विभुं सर्वगतं सुसूक्ष्मम्" [मुं १।१।६] इत्यादि आगम येथें जाणावा. जडत्व सांगितलें त्याचा निरास
करितात - 'आत्म्याला'

॥ विवरण ॥

कारण त्याला स्वयंप्रकाशता फळते. सुषुप्तींत प्रत्यक्षच तिचा अवभास होतो. तिच्याविषयीं अनुमानही आहे 'हा आत्मा स्वयंप्रकाश आहे त्याला स्वसत्तेंत प्रकाशाच्या व्यतिरेकाचा अभाव असल्यामुळें प्रदीप व संवेदना प्रमाणें.' 'आत्मा स्वयंप्रकाश आहे त्याला विषयप्रकाशकत्व असल्यामुळें प्रदीपाप्रमाणें' तसें 'आत्मा स्वयंप्रकाश आहे त्याला विषयप्रकाशाश्रयत्व असल्यामुळें आलोकाप्रमाणें' तसेंच आत्मा अजन्यप्रकाशगुण आहे त्याला प्रकाश-

॥ विवरणव्याख्या ॥

जन्यहेतो स्वप्रकाशत्वाचें समर्थन करितात - 'सुषुप्तींत प्रत्यक्षच' 'मी सुखानें निजलों होतों' असा जो होणारा परामर्श (स्मृति) तरी दिसतो. त्या परामर्शाचें तर सुषुप्तींत अनुभवावांचून अनुपपत्ति असल्यामुळें अनुभवग्राह्य आहे. न त्याला अन्याधीनत्वाचा अयोग असल्यामुळें स्वतस्त्व आहे असा अर्थ. सजातीय प्रकाशानें प्रकाश्यत्वाचा प्रतिषेधक होत असतां साधर्म्यावरून अवेद्यत्व असतां अपरोक्षव्यवहारयोग्यत्व सिद्ध होते. असा अभिप्रायानें सांगतात - 'हा आत्मा' स्वसत्तेंत प्रकाशाभावशून्यत्वामुळें असा हेतूचा अर्थ. व्यतिरेकाचा अभाव असल्यामुळें असें म्हटलें असतां प्रदीपादिकांना विनाशित्व असल्यामुळें साध्यवैकल्य येईल, म्हणून 'प्रकाश' असें विशेषण आहे. तथापि नष्ट प्रदीपांत प्रकाशाच्या व्यावृत्तीमुळें साधनवैकल्य आहे त्याकरितां 'स्वसत्तेंत' असें म्हटलें. हेतूची असिद्धीही नाहीं. कारण जाग्रत स्वप्नांत त्याचा प्रतिभासन सिद्धच आहे. सुषुप्तींत आत्मप्रकाश तर 'मी सुखानें निजलों होतों' इत्यादि परामर्शाच्या अनुपपत्तीनें सिद्ध आहे. सुखादिकांत व्यभिचार होणार नाहीं म्हणून 'द्रव्यत्व असतां' असें विशेषण आहे. येथें हें विवक्षित आहे - 'आत्मा सजातीय प्रकाशाकडून अप्रकाश्य आहे. त्याला द्रव्यत्व असून स्वसत्तेंत प्रकाशाभाव रहितत्व असल्यामुळें प्रदीपाप्रमाणें' 'आत्मा स्वयंप्रकाश आहे त्याला संवेदनाहून इतर-आत्मविशेषगुणव्यतिरिक्तत्व असतां स्वसत्तेंत प्रकाशव्यतिरेकशून्यत्व असल्यामुळें संवेदनाप्रमाणें' असें. प्रकाशकत्व असल्यामुळें' असें म्हटलें असतां बाह्याची असिद्धि होते कारण त्याला प्रकाशनकर्तृत्व आहे. म्हणून सांगतात - 'विषयप्रकाशकत्व' प्रकाशाला आगंतुकत्वामुळें हेतूची असिद्धि मानणाऱ्याचें निराकरण करितात - 'तसेंच आत्मा अज-

चतुर्थ श्लोक

३८
१०६५

॥ विवरण ॥

गुणत्व असल्यामुळे आदित्यादिकांप्रमाणे. 'आत्मा स्वयंप्रकाश आहे त्याला इंद्रियगोचरत्व नसून अपरोक्षत्व असल्यामुळे संवेदनाप्रमाणे'. आगम तर याविषयी दाखविला आहे. पुन: तो सर्व शरीरांत एक आहे. त्याला सर्वत्र अहं असे एकाकार प्रत्यक्ष वेदनीयत्व असल्यामुळे गोत्वाप्रमाणे' शरीरभेदामुळेच मागील शरीरादिकाप्रमाणे भोगानुसंधानाचा प्रसंग नाही. एकांत ही परिमाणभेदामुळे प्रतिक्षणी शरीरभेद ही

॥ विवरणव्याख्यान ॥

'प्रकाशगुण' धर्मी असतां अजन्य प्रकाशगुण असे जाणावे. अन्यथा दृष्टांताला साध्यवैकल्य प्राप्त होईल. प्रकाशकत्वे निराकरण करितात - 'आत्मा स्वयंप्रकाश' 'अपरोक्षत्व असल्यामुळे = अपरोक्ष व्यवहार विषयत्व असल्यामुळे असा अर्थ. घटादिकांची व्यावृत्ति करितात 'इन्द्रियगोचरत्व नसून' धर्मादिकांची व्यावृत्ति करितात - 'अपरोक्षत्व असल्यामुळे' श्रुतीही स्वप्रकाशत्वाविषयी प्रमाण आहे असे सांगतात - 'आगम तर' 'अत्रायं पुरुष: स्वयंज्योति:' (बृ.आ.उ.) इत्यादि आगम जाणावा. आत्म्याला स्वप्रकाशत्व असतांही अनेकत्व सांख्य मानतात. त्यांचे ऐक्य करतात — 'पुन: तो' सर्व अहंप्रत्यय एकविषय आहेत त्यांना एकाकार प्रत्ययत्व असल्यामुळे गाय, गाय, प्रत्ययांप्रमाणे' विमत उत सर्व अहंप्रत्यय आत्मा आत्मविषयक आहेत त्यांना एकाकारत्व अहंप्रत्ययत्व असल्यामुळे गाय गाय प्रत्ययाप्रमाणे, असा अर्थ. पण सर्वत्र आत्मैकत्व असतां स्वशरीराप्रमाणे भोगानुसंधान प्राप्त होते तें तर उपलब्ध होत नाही म्हणून त्याला अप्रयोजकत्व आहे अशी आशंका असतां काय अनवच्छिन्नाला अनुसंधान प्राप्त होते किंवा अवच्छिन्नाला? पहिल्या पक्षी इष्टापत्ति आहे. अशा आणि प्राधान्याने दुसऱ्या पक्षाला दूषित करितात. 'शरीरभेदामुळेच' एका शरीरांत पादावच्छिन्नाला स्तनावच्छिन्न अनुसंधानत्व नसते अशा आणि प्राधान्याने आदि शब्दाचे ग्रहण आहे. पण अनुसंधान शरीरभेदनिबंधन नाही कारण शरीरभेद असतांही अनुसंधान दिसते तें असे - बाल्य कौमार यौवन अवस्थागत शरीरनिष्ठ न्यूनाधिक परिमाणभिन्नत्व आहे. त्यांना न्यूनाधिक परिमाणांत अन्यान्य परिमाणत्व असल्यामुळे घट शरावादि (शरावादि) परिमाणाप्रमाणे अशा अनुमानावरून शरीरभेद सिद्ध होतो असतांही अनुसंधानाप्रमाणे देहभेद असतांही अनुसंधान होते. अशी आशंका असतां दृष्टान्ताचा आणि धर्मीचा करतात 'एकांत ही'

१०६६५

१।१।६।१८

भोक्तैव केवळं न कर्तेत्येके ।

॥व्याख्यान॥

७४।८ त्यांच्या विषय आत्मा आहे असे ते मानतात. 'भोक्तैव केवळं न कर्ता' = केवळ भोक्ताच आहे कर्ता नाही 'इति' = असे 'एके' = एक सांख्य मानतात. पूर्वोक्तच ७४।५ देहादि व्यतिरिक्त आत्म्याला कर्तृत्व त्याचा स्वभाव नाही असे मानणारे - भोक्ताच केवळ अहंप्रत्ययाच्या विषय आहे असे ते मानतात

॥विवरण॥

युक्त नहीक्षणिक प्रत्यभिज्ञेच्या विरोध येतो. व अननुसंधानाच्या प्रसंग येतो. ज्वालेंतर सूक्ष्म देशी- न असता प्रत्यक्षत्व येत होईल सैते. म्हणून एक स्वयंप्रकाश आत्मा आहे असें सिद्ध आहे (तार्किक व प्राभाकरादि मताच्या) उपसंहार करितात- 'म्हणून देहादि व्यतिरिक्त अहंप्रत्ययाच्या विषय'

१३८।१०. पक्षान्तराला सांगतात- 'केवळ भोक्ताच आहे' कर्तृत्व तर क्रियावेश आहे. सर्वगत निरवयव

विवरणव्याख्यान

पुनः क्षणिकात्मवाद्याप्रमाणेच शरीरभेद असतां अनुसंधान होणार नाही असें सांगतात- 'वा अननुसंधानाच्या' शरीराच्या एकत्व प्रत्यभिज्ञेच्या अन्यथासिद्धीचे निरसन करितात- 'ज्वालेंतर' आत्म्याच्या [illegible]चा उपसंहार करितात- 'म्हणून' प्रसंगाने प्राप्त झालेल्या आत्मानात्म्यांच्या विवेकाची समाप्ति करून व्याख्यानाच्या विवरणाला प्रारंभ करितात- 'उपसंहार' व्याख्यानांत कर्तृत्व आत्म्याचा स्वभाव नाही असें सांगितले त्याविषयी हेतु सांगतात- 'कर्तृत्व तर' 'क्रियावेश = क्रियेचे आश्रयत्व. परिस्पंदादिकांच्या अभावाकरिता हेतु सांगतात- 'सर्वगत' परिणामाच्या अभावाकरिता हेतु सांगतात- 'निरवयव' अशा प्रकारच्या आत्म्यातही कर्तृत्व जसे वेदान्त्यांनी आहे त्याप्रमाणे येथें ही संभवेल अशी आशंका असता

॥टीप॥

१ 'प्रत्यभिज्ञेच्या'- 'पूर्वी बाल्यादि अवस्थेंत शरीरभेद भासतो न सांगितला असता तरी येथे अभेद 'भावन प्रत्यभिज्ञानं वस्तुस्थिति' अन्यथा [illegible] सांगितला आहे

॥ व्याख्यान ॥

'मी करितो, जाणतो, भोगतो' असा तर यांच्या सर्वदा अहंप्रत्ययाशी अनुषंग = संबंध नाही। त्यांना हा (कर्तृत्वादिधर्म) त्यांचा विषय नाही. जर असेल तर. त्याच्या उल्लेखावाचून हा उदयाला

॥ विवरण ॥

आत्म्याला तर परिस्पन्द व परिणाम लक्षण क्रियान्वय संभवत नाही. बुद्धीचे कर्तृत्व तर आत्म्याचे होत नसे कारण तादात्म्याध्यासाचा अभाव आहे. कारण। आमच्या असंगत्वादि वाद आहे. दुसऱ्या हेतूला सांगतात - 'मी करितो जाणतो'.
११८।१२३
हा अर्थ - चैतन्याप्रमाणे स्वाभाविकरीतीने आत्म्याचा स्वभावधर्म असेल तर आत्म्याच्या प्रतिभासाप्रत व्यभिचाराला प्राप्त होणार नाही. निरवयव द्रव्याला तर आगन्तुक कोणी धर्म हेतूच्या संबंधाने उत्पादन करणे शक्य नाही - असा. पण आत्म प्रतिभासाशी धर्माश्रयामुळे कर्तृत्वाप्रमाणे भोक्तृत्व ही त्याला असणार नाही अशी.

॥ विवरणव्याख्यान ॥

वैयर्थ्य सांगतात - 'बुद्धीचे कर्तृत्व तर' अध्यासाच्या अभावाकरितां हेतूला सांगतात - 'कारण आमच्या' 'आमच्या' संबंधा नाही. पण 'मी करितो' येथेही कर्तृत्वाला आत्मस्वभावत्व नाही असे सांगितले जाते. म्हणूनही पुनरुक्ति आहे? अशी शंका असतां सांगतात - 'दुसऱ्या हेतूला' पण कर्तृत्वादिकाला व्यभिचारित्व असतांही आत्मधर्मत्व कां असणार नाही? त्यावर सांगतात - 'हा अर्थ' काय त्याला स्वभावधर्मत्व आहे? किंवा आगंतुकत्व? पहिला पक्ष नाही असे सांगतात - 'चैतन्याप्रमाणे' दुसऱ्या पक्षी हे काय तो सहेतुक आहे? किंवा निर्हेतुक? दुसऱ्या पक्षी कुठेतरी प्रसक्ति होईल. असा अभिप्राय ठेवून पहिल्या पक्षाला दूषित करितात - 'निरवयव द्रव्याला', 'आगन्तुक' = प्रागभाववान. पण 'मी भोगतो' असा भोक्तृत्वाचा उल्लेख अनुभवास येत असल्यामुळे व्याख्यानांत त्याच्या उल्लेखाचा अभाव सांगितला त्याची असिद्धि आहे? अशी आशंका असतां सांगतो - 'पण आत्मप्रतिभासाशी' सुखादिकांना आगन्तुकत्व असल्यामुळे भोक्तृत्व हे व्यभिचारी आहे असा अर्थ. पण 'मी' अभोक्ता चैतन्याच्या' व्याख्यानांत चैतन्यस्वरूप भोक्तृत्व आहे असे कसे म्हटले? कारण भोक्तृत्वाला व्यभिचारित्व

अस्ति तद्व्यतिरिक्त ईश्वरः सर्वज्ञः सर्वशक्तिरिति केचित्।

॥ व्याख्यान ॥

ग्राहकोपगार नाही. पण भगवान् भोक्ता हो नाही कारण त्याच्या उत्कृष्टत्याचा अभाव आहे। हे असे नाही. कारण मी असा चेतन त्याच्या समुत्कर्ष आहे. व सर्वांचा सर्वसत्ता आहे व तत्स्वरूप पच भोक्तृत्व आहे. म्हणून भोक्ता च केवळ आहे असे योग्य मानतात.

८-१७७

'तद्व्यतिरिक्तः' = त्या देहादिकांहून व्यतिरिक्त अशा अहंप्रत्ययविषय आत्म्याहून ही अन्य 'ईश्वरः' = सर्वांचे नियमन करणारा 'सर्वज्ञः' = त्यामुळे नियम्यांचा सर्वरूपाने जाणणारा ~~'सर्वशक्तिः' = सर्वांच्या नियमनशक्तीने संपन्न~~

॥ विवरण ॥

आशंका घेतात-'पण भगवान्' परिहार करितात-'हे असे नाही' इत्यादि वाक्यसमाप्त भोक्तृत्व आहे सुखदुःखांचा अन्वय नाही व त्यामुळे अवस्थात्रयांतही [illegible] अभावामुळे केवळ भोक्ता आहे असा अर्थ

१६८।२१

पक्षान्तराचा सांगणाऱ्या भाष्याचे व्याख्यान करितात-'त्या देहादिकांहून' अन्य सिद्ध ईश्वर असा उत्तरवाक्या-

पा.टी. ४००।२

शी संबंध. ईश्वर असे नाममात्र नाही असें सांगतात-'सर्वांचे' सर्वज्ञत्वावाचून ईशनाची अनुपपत्ति असल्यामुळे स-र्वज्ञत्व देखील ग्रहण केले पाहिजे असें सांगतात 'त्यामुळेच' शक्तीचा अभाव असतां ईशनाची अनुपपत्ति असल्यामुळे तो

॥ विवरण व्याख्यान ॥

आहे अशी आशंका असतां तात्पर्य सांगतात-'इत्यादि वाक्यसमाप्त' सुषुप्तीत ही अज्ञानरूप सुखदुःखाचे द्रष्टृत्व असल्यामुळे त्याचा अभाव नाही असा अर्थ.

पण श्रुतिप्रमाणाने ईश्वराची सिद्धि होत नाही? अशी आशंका असतां भाष्याच्या व्याख्यानाच्या योजनेने अनुमानप्रमाणाचा दाखवितात असें सांगतात-'भाष्याचे व्याख्यान करितात' अहंप्रत्ययविषयाहून ही अन्य यावत्साकांक्षत्व असल्यामुळे 'येथ ईश्वर' याच्यापूर्वी पद [illegible] दाखवितात-'सिद्ध ईश्वर' 'ईश्वर असे' इत्यादि ग्रंथ म्हणजे पण श्रुतीवरून ईश्वराची

चतुर्थवर्णक

॥ व्याख्यान ॥

जाणणारा, 'सर्वशक्ति' = सर्वांच्या नियमन शक्तीने संपन्न. 'शरीरींना' मनाच्या योगाने ही अचिंत्यरूप अशा, प्रेक्षावानाच्या कर्तृत्वावरून असंभाव्यमान अशा, घटादि कार्यावरून ज्याप्रमाणे कुलालादि त्याप्रमाणे शरीर व भुवनाच्या विरचनकार्यावरून कळणारा. सर्वज्ञ-

॥ विवरण ॥ १९८।२२

देखील ग्रहणीय आहे असें सांगतात - 'सर्वांच्या नियमन' येथें ईश्वराविषयी वैशेषिकांच्या अनुमानाला दाखवितात - 'शरीरींना' विवादविषयाला प्राप्त झालेले भूतभौतिकलक्षण, शरीर भुवनविरचनकार्य, स्वरूप उपादान, संप्रदान, प्रयोजन उपकरणादि विषयक विज्ञानवान् कर्तृपूर्वक आहे, त्याला विविध विन्यासरूप कार्यत्व असल्यामुळे प्रासादादिकांप्रमाणे' अशा. 'कल्पनालाघवाने' एक कर्त्याच्या ग्रहणामुळे सर्वज्ञत्वादिकांची सिद्धि होते. सांख्यतत्वानुसारी योगांच्या अनुमानाला दाखवितात - 'सातिशयाची मर्या-

॥ विवरण व्याख्यान ॥

सिद्धि होत असल्यामुळे 'शरीरींना' या अनुमानाचा काय उपयोग? अशी आशंका असतां श्रुतीचा अनुमानांत अंतर्भाव होत असल्या- ग्राह्य आहे? १००।७
मुळे हें सांगितले असें सांगतात - 'येथें' त्या अनुमानाला स्पष्ट करितात - 'विवादविषयाला' 'स्वरूपादि विज्ञानवान् कर्तृपूर्वक आहे' असा साध्याचा निर्देश आहे. 'भूतभौतिकलक्षण' इत्यादि विशेषण धर्मींच्या स्पष्टीकरणार्थ आहे. अदृष्ट द्वारा जीवच कर्ते असल्यामुळे या अनुमानाला (हेतूला) सिद्धसाध्यता आहे? या शंकेचे निवारण करितात - 'स्वरूप' 'संप्रदान' जीव ज्याच्या करिता कार्य आहे असा) 'प्रयोजन' - उपकरणादि (त्यांच्याद्वारा सुख दुःख) उत्पन्न होतात. त्या कार्याच्या [illegible]करिता 'विविध' हे विशेषण आहे. 'विपक्ष अनेक कर्तृक आहे' त्याला नियमित कार्यत्व असल्यामुळे प्रासादादिकांप्रमाणे' अशा अप्रसंगाला निरसित करितात - 'कल्पनालाघवाने' एकाच सकल जगन्निर्माणाचा संभव असतां अनेक कर्त्यांच्या अंगीकाराला गौरव आहे. उत्तर लाघव आहे म्हणून सर्वज्ञ ईश्वराची सिद्धि होते असा अर्थ. ईश्वरासीच ज्ञानादि शक्तींचें

॥ व्याख्यान ॥

७।१५
ग्रंथांची मर्यादा प्राप्त असा. परिणामाचा जाणणारा. ज्ञानही सातिशय आहे. म्हणून क्वचित् मर्यादेला प्राप्त झालेले. जिन सर्व विषयक आहे म्हणून सर्ववित्. सर्वदा सिद्ध ईश्वर केवल.

विवरण

१९९/३
ज्ञानादि: "विवादविषयाचा प्राप्त झालेल्या ज्ञानऐश्वर्य शक्ति कोठें सर्व विषयक ज्ञानैश्वर्यशक्तीवाचून नसेत; त्यांना तरतमभावाने उत्कृष्यमाण विषय व्याप्ति धर्मत्व असल्यामुळे, स्वविषय देश व्यापी परिमाणधर्म प्रमाणे" (अनुमानाच्या) — अशा मर्यादाप्राप्त असर्व विषयत्व असतांही संभवते. म्हणून किंवा सर्व विषयक' असें म्हटले. कारण अनुमानांत तसेच दाखविले आहे. सर्वदासिद्ध ईश्वर अशा नैय्यायिकांच्या प्रतिज्ञाच्या अ.

॥ विवरण व्याख्यान ॥

अंशांतात:- 'विवादविषयाचा प्राप्त झालेल्या सर्वविषय ज्ञानादि शक्तीवाचून असा साधन असतां बाध होतो. म्हणून त्याकरितां 'विषयव्याप्ति' असें म्हटले ज्ञानैश्वर्यशक्ति" 'धर्मत्व असल्यामुळे' असें म्हटले असतां संयोगांत व्यभिचार होतो ~~म्हणून~~ त्याकरितां 'विषय-व्याप्ति' असें म्हटले. औत्सुक्यादिकांची निवृत्ति करितात- तरतमभावानें "उत्कृष्यमाण धर्मत्वामुळे" असें म्हटलें असता एकाच्या अभाव दोन्हींच्या अभाव अशा रीतीने प्रतीयमान तरतमभावांत व्यभिचार होतो त्याकरितां 'विषय व्याप्ति' असें म्हटले. अभावाचा प्रतियोगी विषयाश्रयत्व नसल्यामुळे व्यभिचार होत नाही. अशा अर्थी स्वविषय व्यंजो-देशांतो स्वविषय देशांत व्याप्त असलेला जो परिमाण धर्म त्याप्रमाणे. असा अर्थ केला हे अनुपपन्न आहे. कारण सर्व विषयक ज्ञान श्रमे ~~[illegible]~~ अन्यत्र प्रसिद्ध आहे तरी किंवा अप्रसिद्धी पहिल्या पक्षी अनुमानाचा वैयर्थ्य आहे दु-सऱ्या पक्षी अप्रसिद्ध विशेषणत्व आहे. असें दृष्टान्ताला साध्यविकलता आहे. 'विषयव्याप्ति' येथेही काय विषयाश्रय कोणता आहे? किंवा आश्रयपरी? पहिल्या पक्षी साधन वैकल्य आहे. दुसऱ्या पक्षी असिद्धि आहे? त्याकरितां हें सांगितले जाते- 'ज्ञानैश्वर्यशक्ति कोठे परम मर्यादेला प्राप्त होतात त्यांना सातिशयत्व असल्यामुळे.

॥ व्याख्यान ॥

असे केवढा प्रश्न शब्दाचा अर्थ आहे; असे "कश्चित्" कोणी (वैशेषिक योगी व नैय्यायिक) जाणतात.

६४।१८ पण 'मी' असा प्रतीतीनें सर्व लोक आत्म्याचा प्रत्यय घेतो. व आत्मा ब्रह्म आहे म्हणून

॥ विवरण ॥

गुणानाच दाखवितात - 'विवादविषयाला प्राप्त झालेली धर्माधर्म फलें कर्म त्याचे फळ संप्रदान उपकरणादिकांच्या विज्ञानवानाकडून प्रदीयमान आहेत, त्यांना व्यवहित कर्मफलत्व असल्यामुळे सेवाविषयक प्रमाणे' - असे. म्हणून ईश्वर सिद्ध आहे.

